# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, स्व. इंदिरागांधी भवन, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृह

**मा. स्थायी समिती सभापती पदाच्या निवडीसाठी दि. 18/11/2017 रोजी सकाळी 11.00 वाजता आयोजित स्थायी समिती विशेष बैठकीचे इतिवृत्त.**

मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडील पत्र क्र. मा. विभागीय आयुक्त यांचे पत्र क्र. साशा/कार्या-3/नपा-2/पिठासीन अधि./मि.भा.मनपा/2017, दि. 26/10/2017 अन्वये, मिरा भाईंदर महानगरपालिका स्थायी समिती सभापती या पदावर निवड करणेसाठी डॉ. प्रशांत नारनवरे, मा. जिल्हाधिकारी, पालघर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका स्थायी समिती सभापती पदाची निवड करण्यासाठी बोलाविण्यात आलेली आजची विशेष बैठक सकाळी 11.00 वाजता डॉ. प्रशांत नारनवरे, मा. जिल्हाधिकारी, पालघर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली. सदर सभेस खालील स्थायी समिती सदस्य उपस्थित होते. उपस्थित सदस्यांची ओळख व खात्री महापालिका सचिव श्री. वासुदेव शिरवळकर यांनी केली.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | उपस्थिती |
|---|---|---|
| 1 | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | हजर |
| 2 | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | हजर |
| 3 | श्री. व्यास रवि वासुदेव | हजर |
| 4 | श्रीम. यादव मिरादेवी रामलाल | हजर |
| 5 | श्री. तिवारी अशोक सुर्यदेव | हजर |
| 6 | श्री. दळवी प्रशांत ज्ञानदेव | हजर |
| 7 | श्रीम. रावल मेघना दिपक | हजर |
| 8 | श्री. खंडेलवाल सुरेश जगदीश | हजर |
| 9 | श्री. विरानी अनिल रावजीभा | हजर |
| 10 | श्री. म्हात्रे मोहन गोपाळ | हजर |
| 11 | श्रीम. अनिता पाटील | हजर |
| 12 | श्रीम. दिप्ती भट्ट | हजर |
| 13 | श्रीम. वंदना विकास पाटील | हजर |
| 14 | श्रीम. तारा विनायक घरत | हजर |
| 15 | श्रीम. नुरजहा नजर हुसेन | हजर |
| 16 | श्री. जुबेर इनामदार | हजर |

सर्वप्रथम महानगरपालिका सचिव यांनी उपस्थितांचे स्वागत केले व विशेष बैठकीचे प्रयोजन व या निवडीची प्रक्रिया उपस्थितांना समजावून सांगितली व विषयपत्रिकेवरील विषयाचे वाचन केले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण 2 कलम 21 पोटकलम (1) अन्वये मा. स्थायी समितीवर असणाऱ्या सदस्यांपैकी एका सदस्याची एक वर्षाकरिता सभापती, स्थायी समिती म्हणून नेमणुक करणेबाबत.

निर्धारित कार्यक्रमानुसार मंगळवार दिनांक 14/11/2017 रोजी दुपारी 3.00 ते 5.00 वाजेपर्यंत स्थायी समिती सभापती पदाच्या निवडीसाठी महानगरपालिका सचिव यांचेकडे प्राप्त झालेले 3 नामनिर्देशन पत्रे पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी मा. महानगरपालिका सचिव यांनी मा. पिठासीन अधिकारी यांच्याकडे दिनांक 18/11/2017 रोजी सकाळी 11.10 वाजता सादर करण्यात आले. त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **उमेदवाराचे नाव** | **सुचकाचे नाव** | **अनुमोदकाचे नाव** |
|---|---|---|---|
| 1 | श्री. पाटील धृवकिशोर मन्साराम | श्री. विराणी अनिल रावजीभा□ | श्री. व्यास रवि वासुदेव |
| 2 | श्री. पाटील धृवकिशोर मन्साराम | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | श्री. खंडेलवाल सुरेश जगदिश |
| 3 | श्रीम. घरत तारा विनायक | श्रीम. अनिता जयवंत पाटील | श्री. इनामदार जुबेर अब्दुल्ला |

तद्नंतर मा. पिठासीन अधिकारी यांनी प्राप्त झालेले नामनिर्देशन पत्र उपस्थितांसमोर वाचून दाखवले. नामनिर्देशन पत्राच्या छाननीचे काम सकाळी 11.15 वाजता सुरु झाले.

1. सर्वप्रथम श्री. पाटील धृवकिशोर मन्साराम यांच्या नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली. श्री. पाटील धृवकिशोर मन्साराम यांच्या नामनिर्देशन पत्रावर सुचक म्हणून स्थायी सामिती सदस्य श्री. विराणी अनिल रावजीभा□ यांनी स्वाक्षरी केली आहे. व अनुमोदक म्हणून श्री. व्यास रवि वासुदेव यांनी स्वाक्षरी केलेली आहे. छाननी दरम्यान नामनिर्देशन पत्रांवरील उमेदवार, सुचक व अनुमोदक यांच्या ओळखीबाबत व त्यांच्या स्वाक्षऱ्यांची खात्री महापालिका सचिव श्री. वासुदेव शिरवळकर यांच्यामार्फत करण्यात आली. छाननी पुर्ण झाल्यानंतर या नामनिर्देशनपत्रावर कोणाची हरकत आहे किंवा कसे याबाबत उपस्थितांना विचारणा करण्यात आली. उपस्थितांपैकी कोणीही हरकत घेतली नाही. त्यामुळे श्री. पाटील धृवकिशोर मन्साराम यांचे नामनिर्देशनपत्र छाननीअंती वैध ठरविणेत आले.
2. श्री. पाटील धृवकिशोर मन्साराम यांच्या द्वितीय नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली. श्री. पाटील धृवकिशोर मन्साराम यांच्या नामनिर्देशन पत्रावर सुचक म्हणून स्थायी सामिती सदस्य श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल यांनी स्वाक्षरी केली आहे. व अनुमोदक म्हणून श्री.

खंडेलवाल सुरेश जगदिश यांनी स्वाक्षरी केलेली आहे. छाननी दरम्यान नामनिर्देशन पत्रांवरील उमेदवार, सुचक व अनुमोदक यांच्या ओळखीबाबत व त्यांच्या स्वाक्षऱ्यांची खात्री महापालिका सचिव श्री. वासुदेव शिरवळकर यांच्यामार्फत करण्यात आली. छाननी पुर्ण झाल्यानंतर या नामनिर्देशनपत्रावर कोणाची हरकत आहे किंवा कसे याबाबत उपस्थितांना विचारणा करण्यात आली. उपस्थितांपैकी कोणीही हरकत घेतली नाही. त्यामुळे श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम यांचे नामनिर्देशनपत्र छाननीअंती वैध ठरविणेत आले.

3. श्रीम. घरत तारा विनायक यांच्या नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली. श्रीम. घरत तारा विनायक यांच्या नामनिर्देशन पत्रावर सुचक म्हणून स्थायी सामिती सदस्या श्रीम. अनिता जयवंत पाटील यांनी स्वाक्षरी केली आहे व अनुमोदक म्हणून श्री. इनामदार जुबेर अब्दुल्ला यांनी स्वाक्षरी केलेली आहे. छाननी दरम्यान नामनिर्देशन पत्रांवरील उमेदवार, सुचक व अनुमोदक यांच्या ओळखीबाबत व त्यांच्या स्वाक्षऱ्यांची खात्री महापालिका सचिव श्री. वासुदेव शिरवळकर यांच्यामार्फत करण्यात आली. छाननी पुर्ण झाल्यानंतर या नामनिर्देशनपत्रावर कोणाची हरकत आहे किंवा कसे याबाबत उपस्थितांना विचारणा करण्यात आली. उपस्थितांपैकी कोणीही हरकत घेतली नाही. त्यामुळे श्रीम. घरत तारा विनायक यांचे नामनिर्देशनपत्र छाननीअंती वैध ठरविणेत आले.

वरीलप्रमाणे दोन उमेदवारांचे तिनही अर्ज वैध करण्यात आले. छाननी अंती वैध उमेदवारांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **उमेदवाराचे नाव** |
|---|---|
| 1 | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम |
| 2 | श्रीम. घरत तारा विनायक |

अशा प्रकारे छाननीचे काम सकाळी 11.10 मि. सुरु करुन सकाळी 11.15 मि. संपविण्यात आले. त्यांनतर पीठासीन अधिकारी यांनी महाराष्ट्र महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांच्या सभापती निवडणूक घेणे) नियम 2007 मधील नियम 5(3) अन्वये ज्या कोणत्या उमेदवारास आपले नामनिर्देशन पत्र मागे घ्यावयाचे असेल त्यांनी सकाळी 11.16 ते 11.31 या 15 मिनिटाच्या कालावधीत लेखी नोटीस देवून नामनिर्देश पत्र मागे घेता येल असे जाहिर केले.

दिलेल्या मुदतीमध्ये उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतलेली नाही. त्यामुळे दोन उमेदवार रिंगणात राहिलेले आहेत.

उमेदवार दोन शिल्लक असल्याने नियम 6(2) प्रमाणे उमेदवाराची नावे वर्णानुक्रमे लावणे आवश्यक असुन, वर्णानुक्रमे नावे पुढीलप्रमाणे आहेत.

1) श्रीम. घरत तारा विनायक

2) श्री. पाटील धृवकिशोर मन्साराम

" सभापती " पदाच्या निवडणुकीसाठी दोन उमेदवार शिल्लक राहिले आहेत. सभापती पद हे एकच असल्याने व उमेदवार दोन शिल्लक राहिल्याने नियम 6 (3) प्रमाणे **"हात वर"** करुन मतदान घेण्यात येत आहे. प्रथम उमेदवार श्रीम. घरत तारा विनायक यांना ज्यांना मत द्यावयाचे आहे त्यांनी हात वर करुन आपले मत नोंदवावे, असे पिठासीन अधिकारी यांनी सांगितले. तेव्हा श्रीम. घरत तारा विनायक यांना खालील सदस्यांनी हात वर करुन आपले मत नोंदविले.

| अ.क्र. | सदस्याचे नांव |
|---|---|
| 1 | श्रीम. अनिता पाटील |
| 2 | श्रीम. दिप्ती भट्ट |
| 3 | श्रीम. वंदना विकास पाटील |
| 4 | श्रीम. तारा विनायक घरत |
| 5 | श्रीम. नुरजहॉ नझर हुसैन |
| 6 | श्री. इनामदार जुबेर |

दुसरे उमेदवार श्री. पाटील धृवकिशोर मन्साराम यांना ज्यांना मत द्यावयाचे आहे त्यांनी हात वर करुन आपले मत नोंदवावे, असे पिठासीन अधिकारी यांनी सांगितले. त्यानंतर श्री. पाटील धृवकिशोर मन्साराम यांना खालील सदस्यांनी हात वर करुन आपले मत नोंदविले.

| अ.क्र. | सदस्याचे नांव |
|---|---|
| 1 | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल |
| 2 | श्री. पाटील धृवकिशोर मन्साराम |
| 3 | श्री. व्यास रवि वासुदेव |
| 4 | श्रीम. यादव मीरादेवी रामलाल |
| 5 | श्री. तिवारी अशोक सुर्यदेव |
| 6 | श्री. दळवी प्रशांत ज्ञानदेव |
| 7 | श्रीम. रावल मेघना दिपक |
| 8 | श्री. खंडेलवाल सुरेश जगदीश |
| 9 | श्री. विरानी अनिल रावजीभा |
| 10 | श्री. म्हात्रे मोहन गोपाळ |

हात वर करुन मतदान घेतले असता 1) श्रीम. घरत तारा विनायक यांना 06 इतकी मते व 2) श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम यांना 10 इतकी मते मिळाली. तसेच 00 सदस्य तटस्थ राहिले.

या दोन्ही उमेदवारांपैकी सर्वात जास्त मते श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम यांना मिळाल्याने ते **सभापती, स्थायी समिती** पदी बहुमताने निवडून आल्याचे नियम 6 (7) अन्वये पिठासीन अधिकारी यांनी घोषीत केले.

निवडणूकीबाबत सर्व अभिलेख महापालिका सचिव, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्याकडे सादर करण्यात आले. अभिलेख्यांच्या प्रमाणित प्रतींची मागणी केल्यावर त्या संबंधितांना देण्याबाबत महापालिका सचिवांना निर्देश देण्यात आले. सभेच्या पूर्ण कामकाजाचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले. तद्नंतर उपस्थितांचे आभार मानून विशेष बैठकीचे कामाकाज सकाळी 11.38 वाजता संपल्याचे जाहिर केले.

**दिनांक :- 18/11/2017**
**स्थान :- मुख्य कार्यालय, स्व. इंदिरागांधी भवन, दुसरा मजला, लाल बहाददुर शास्त्री सभागृह, मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(डॉ. प्रशांत नारनवरे)**
**पिठासीन अधिकारी**
**तथा**
**जिल्हाधिकारी, पालघर**
**स्थायी समिती सभापती निवडणूक 2017**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**